(निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाद्वारा)

# जनता सहकारी बँक लि., पुणे

## (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

मुख्य कार्यालय – १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रस्ता, पुणे – ४११ ००२ www.janatabankpune.com

## विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

**(केवळ दि. ३१/१२/२०२१ अखेरच्या सभासदांकरिता)**

जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक) या बँकेच्या **सन २०२२ ते २०२७** या कालावधीकरिता, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दि. १५ जून २०२२ रोजी **संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम** घोषित केला होता. सदर कार्यक्रमानुसार निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. सदर प्रक्रियेमध्ये अर्ज माघारी घेण्याच्या दिनांकानंतर (दि. २८/०६/२०२२) संचालक मंडळासाठी निवडून द्यावयाच्या जागेइतकेच उमेदवारांचे अर्ज शिल्लक राहिल्याने बँकेच्या निवडणुकीबाबतच्या निकालाची घोषणा करण्यासाठी मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी नियम २००२ मधील नियम १९ व त्याखालील परिशिष्ट मधील अ. क्र. ५ (a) मधील तरतुदीनुसार **रविवार, दि. १७ जुलै २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता** बँकेच्या दि. ३१/१२/२०२१ अखेरच्या सर्व सभासदांकरिता विशेष सर्वसाधारण सभा माझ्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे.

सदर सभा **नवीन मराठी शाळा, स. नं. ३३८ ते ३४२, शनिवार पेठ, पुणे ४११०३०** येथे खालील विषयांकरिता घेण्यात येत आहे.

*** सभेपुढील विषय ***

१) सन २०२२ ते २०२७ या कालावधीकरिता एकूण १७ संचालक मंडळ सदस्यांच्या निवडीची घोषणा करणे.

**मतदार संघ :**

| | | |
|---|---|---|
| १) सर्वसाधारण | – | १४ सदस्य |
| २) अनुसूचित जाती किंवा जमाती | – | १ सदस्य |
| ३) महिला राखीव | – | २ सदस्य |
| **एकूण संचालक सदस्य** | – | **१७** |

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय :**
उपनिबंधक (नागरी बँका), सहकार आयुक्त व निबंधक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, तिसरा मजला,
नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे–४११ ००१
ईमेल : rojsb22@gmail.com

Janata Sahakari Bank Ltd. Pune (BOD Election 2022) Returning Officer

**आनंद अ. कटके**
निवडणूक निर्णय अधिकारी
जनता सहकारी बँक लि., पुणे तथा
उपनिबंधक (नागरी बँका)

**पुणे, दि. २९/०६/२०२२** जा.क्र. ४०/२०२२

टीप :

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर विशेष सर्वसाधारण सभा त्याच दिवशी सकाळी ९.३० वाजता वरील ठिकाणीच होईल. या सभेस गणसंख्या पूर्ततेची आवश्यकता राहणार नाही.

२) बँकेच्या उपविधीनुसार असलेल्या मतदार संघाप्रमाणे जेवढ्या जागा आहेत, त्या त्या जागांसाठी तेवढेच नामनिर्देशनपत्र शिल्लक राहिल्याने पुढील मतदान प्रक्रिया पार पाडण्याची आवश्यकता राहिलेली नाही, याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.